International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 22 March - April - 2025

भारतीय भाग बाजारातील घसरण

प्रा. डॉ. उदय खंडू टेके

सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग म.स.गा.महाविद्यालय,मालेगाव कॅम्प.

Corresponding Author - प्रा.डॉ.उदय खंडू टेके

DOI - 10.5281/zenodo.15645891

२८ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतीय शेअर बाजार उघडताच मोठ्या प्रमाणात घसरण झाली. सेन्सेक्स १००० पेक्षा जास्त अंकांनी घसरून ७३,१९८.१० अंकांवर बंद झाला. तसेच, निफ्टी-५० देखील ३१६ अंकांनी (१.४ टक्क्यांनी) घसरून २२,१२४.७० च्या पातळीवर पोहोचला. ही घसरण इतकी तीव्र होती की अवघ्या अर्ध्या तासातच बी.एस.ई.वर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजारमूल्य सुमारे ६.१ लाख कोटी रुपयांनी कमी झाले. यासह, निफ्टी आणि सेन्सेक्स आता ९ महिन्यांच्या नीचांकी पातळीवर पोहोचले आहेत. फेब्रुवारीमध्ये निफ्टी व सेन्सेक्स ५ टक्के पेक्षा जास्त प्रमाणात घसरला आहे. निफ्टी तर २९ वर्षांत प्रथमच सलग पाचव्या महिन्यात घसरणीसह बंद झाला आहे.

खालील तक्त्यात सेप्टेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या पाच महिन्याच्या कालावधीत सेन्सेक्स व निफ्टी मधील घसरण दर्शवली आहे.

तक्ता क्र.०१- सेन्सेक्स

Month	Open	High	Low	Close	Month wise Falling	% Falling
सप्टें.-२४	८२७२५.२८	८५९७८.२५	८०८९५.०५	८४२९९.७८	-१६७८.४७	-१.९५२
ऑक्टो.-२४	८४२५७.१७	८४६४८.४	७९१३७.९८	७९३८९.०६	४,९१०.७२	-५.८२५
नोव्हें.-२४	८००२३.७५	८०५६९.७३	७६८०२.७३	७९८०२.७९	+४१३.७३	+०.५१२
डिसें.-२४	७९७४३.८७	८२३१७.७४	७७५६०.७९	७८१३९.०१	१,६६३.७८	२.०८४
जाने.-२५	७८२६५.०७	८००७२.९९	७५२६७.५९	७७५००.५७	-६३८.४४	०.८१७
फेब्रु.-२५	७७६३७.०१	७८७३५.४१	७३१४१.२७	७३१९८.१	४,३०२.४७	५.५५१
	सप्टेंबर २०२४ उच्च ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत				१२७८०.१५	१४.८६%

Source-BSE

आलेख क्र.०१- सेन्सेक्स



Source-Trading View

तक्ता क्र.०२- निफ्टी

Month	Open	High	Low	Close	Month wise Falling	% Falling
सप्टें.-२४	२६०६१.३०	२६२७७.३५	२५७९४.१	२५८१०.८५	- ४६६.५	१.७७५
ऑक्टो.-२४	२४३४९.८५	२४३७२.४५	२४१७२.६	२४२०५.३५	-१,६०५.५	६.२२०
नोव्हें.-२४	२३९२७.१५	२४१८८.४५	२३९२७.१५	२४१३१.१	-७४.२५	०.३०६
डिसें.-२४	२३५६०.६	२३६८९.८५	२३४६०.४५	२३६४४.८	-४८६.३	२.०१५
जाने.-२५	२३२९६.७५	२३५४६.८	२३२७७.४	२३५०८.४	-१३६.४	०.५७६
फेब्रु.-२५	२२४३३.४	२२४५०.३५	२२१०४.८५	२२१२४.७	-१,३८३.९३	५.८८
	सप्टेंबर २०२४ उच्च ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत				४,१५२.६५	१५.८०३

Source-NSE

आलेख क्र.०२- निफ्टी



Source-Trading View

वरील सारणीवरून हे स्पष्टपणे दिसते की,सप्टेबर २०२४ च्या सर्वोच्च स्थानावरून सेन्सेक्स व निफ्टी १५% पर्यंत घसरले आहेत.या घसरणीत २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुंबई भाग बाजारातील सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल, जे २७ सप्टेंबर २०२४ रोजी ४७९ लाख कोटी रुपये

होते,ते ३८४ लाख कोटी रुपयांपर्यंत घसरले होते (१९.८३% घट). आघाडीची रोखे भांडार असलेल्या 'एन.एस.डी.एल.' च्या आकडेवारीनुसार ऑक्टोबर २०२४ पासून फेब्रु.२०२५ पर्यंत २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे शेअर्स परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी विकले आहेत, परिणामी बाजारात सततची घसरण दिसून येत आहे.

घसरणीची कारणे:

या घसरणीमागील मुख्य कारण अमेरिकेतील नवीन ट्रम्प सरकारने घेतलेले आर्थिक निर्णय होय. यामध्ये मुख्यतः मेक्सिको आणि कॅनडा या देशांतील उत्पादनांवर आयात शुल्क ४ मार्च २०२५ पासून २५ टक्के केले जाणार असल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. चीनवरदेखील १० टक्क्यांचा अतिरिक्त आयात कर या तारखेपासून लादण्यात येणार आहे. त्याचबरोबर युरोपमधून येणाऱ्या वस्तूंवरदेखील २५ टक्के आयात कर लादण्याचे सूतोवाच ट्रम्प यांनी केले. यामध्येच अमेरिकेतील सर्वात मोठी सेमीकंडक्टर चिप बनवणारी कंपनी एनव्हिडीयाचे समभाग कोसळले. याचा फटका भारतीय आयटी निर्देशांकाला बसला. भविष्यकाळात व्यापारयुद्ध अधिक तीव्र होण्याच्या शक्यतेने परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी २०२५ साल सुरू झाल्यापासून आतापर्यंत एकूण १.१३ लाख कोटींपेक्षा अधिकची गुंतवणूक भारतीय भांडवल बाजारातून काढून घेतली आहे. या सर्वांचा एकत्रित परिणाम दोन्ही निर्देशांक कोसळण्यात झाला.

याबरोबरच आणखी काही कारणे या घसरणीमागची सांगता येतील.

१. भारतीय बँकांचे उत्पन्न घसरण्याचा अंदाज - वित्तीय विश्लेषकांचा अंदाज आहे की, वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या चौथ्या तिमाहीत भारतीय बँकांचे उत्पन्न बाजाराच्या अपेक्षेपेक्षा कमी राहील, ज्यामुळे शेअर बाजारात विक्रीचा दबाव वाढत आहे. वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या तिसऱ्या तिमाहीत उत्पन्न आधीच निराशाजनक होते आणि कमकुवत निकालांचा आणखी एक टप्पा गुंतवणूकदारांच्या भावनांवर मोठा परिणाम करत आहे. निफ्टी ५० च्या निर्देशांकात बँकिंग स्टॉकचा वाटा जवळजवळ ३० असल्याने, या क्षेत्राची कमकुवतता थेट निफ्टी ५० आणि सेन्सेक्स दोन्हीवर परिणाम करत आहेत.

२. देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदार (DII) बाजाराच्या उच्च पातळीवर अडकले आहेत: सामान्यत, जेव्हा परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार (FII) भारतीय बाजारात विक्री करतात, तेव्हा देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदार (DII) बाजारात खरेदी करण्यासाठी पुढे येतात. परंतु, यावेळी तसे घडले नाही. याचे एक प्रमुख कारण म्हणजे DII अजूनही लक्षणीयरीत्या बाजाराच्या उच्च पातळीवर आहेत आणि बाजाराच्या दिशेचे चित्र स्पष्ट होईपर्यंत ते पुन:खरेदी करण्यास तयार नाहीत.

३. एम.एस.सी.आय.(Morgan Stanley Capital International) पुनर्संतुलन: एम.एस.सी.आय. ही गुंतवणूक निर्णय साधनांच्या जागतिक प्रदात्यांपैकी एक आहे. ही संस्था निर्देशांकातील भागांच्या भाराचे (weight) पुनर्संतुलन करते. या संस्थेचे अपेक्षित पुनर्संतुलन देखील बाजारातील मंदीला कारणीभूत ठरत आहे. २८ फेब्रुवारी रोजी बाजार बंद झाल्यानंतर लागू होणारे हे पुनर्संतुलन व्यापाराच्या प्रमाणात आणि विशिष्ट

स्टॉकमध्ये भांडवलाच्या आवक/जावकवर परिणाम करू शकते. एम.एस.सी.आय. पुनर्संतुलन करण्यापूर्वी डी.आय.आय. आणि एफ.आय.आय. दोघेही त्यांचे पोर्टफोलिओ पुनर्बांधणी करतील अशी अपेक्षा आहे.

४. कंपन्यांच्या उत्पन्नातील घट/बाजाराचे जास्त मूल्य आहे : भारतातील कंपन्यांचे उत्पन्न कमी होत आहे, तसेच भारताचा जी.डी.पी.सुद्धा घटत आहे. भारतातील कंपन्यांचे ऑक्टो.२०२४ ते डिसे.२०२४ या तिमाहीतील उत्पन्न सुद्धा पाठीमागील पाच वर्षातील कोणत्याही तिमाही उत्पन्नापेक्षा कमी आहे. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये जी.डी.पी.६.४ टक्के होता तर २०२५-२६ मध्ये जी.डी.पी.६.६ टक्के राहील असा रिझर्व बँकेचा अंदाज आहे. पाठीमागील चार वर्षातील सर्वात कमी जी.डी.पी. आहे. याचा परिणाम सुद्धा भाग बाजारावर झालेला आहे.

५. अमेरिकेतील बाँड उत्पन्नात वाढ: अमेरिकन बाँड मार्केटमध्ये परताव्याचे दर वाढत आहेत. त्यामुळे एफ.आय.आय. भारतातून भांडवल काढून ते अमेरिकन बाँड मार्केटमध्ये पुन्हा गुंतवत आहेत, जे सध्या एफ.आय.आय. च्या दृष्टीने अधिक आकर्षक परतावा देत आहेत. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनात हा ट्रेंड तीव्र झाला आहे आणि जोपर्यंत अमेरिकन बाँड मार्केट आकर्षक राहील तोपर्यंत परदेशी गुंतवणूकदार भारतीय बाजारपेठेत विक्री करत राहण्याची शक्यता आहे.सध्या अमेरिकन बाँड मार्केटमध्ये परताव्याचे दर ४.२५% आहेत. गेल्या वर्षीच्या सप्टेंबरच्या तुलनेत ते अजूनही जास्त आहेत.

६. भारत, चीन, मलेशिया, थायलंड यासारख्या देशांमधून भांडवल अमेरिकेकडे सरकत आहे . याचे कारण म्हणजे अमेरिकेत गुंतवणूकदारांना जास्त जोखीम न घेता ६ ७-टक्के परतावा मिळत आहे.

७. भारतातून अमेरिका आणि चीनमध्ये भांडवल स्थलांतरन: ट्रम्प प्रशासनाच्या पुनःस्थापनेपासून, अमेरिकन शेअर बाजार जगभरातून मोठ्या प्रमाणात भांडवल प्रवाह आकर्षित करत आहे. याव्यतिरिक्त, चीन गुंतवणुकीसाठी एक आकर्षक ठिकाण बनले आहे. या देशातील व्यावसायिक नेत्यांच्या नेतृत्वाखालील नवीन उपक्रमांमुळे संभाव्य आर्थिक प्राप्तीबद्दल आशावाद निर्माण झाला आहे. यामुळे चिनी शेअर बाजारात गुंतवणूक वाढत आहे, "भारत विकून टाका, चीन विकत घ्या" ही कहाणी एफ.आय.आय.मध्ये लोकप्रिय होत आहे, विशेषतः जेव्हा चीनने व्याजदर कपात, स्थावर मालमत्ता क्षेत्राला पाठिंबा आणि तरलता व्यवस्थापनाद्वारे आपली अर्थव्यवस्था स्थिर केली आहे.

संदर्भ:

१. महाराष्ट्र टाइम्स - ३१/०१/२०२५
२. महाराष्ट्र टाइम्स -११/०३/२०२५
३. पुढारी - ४/०३/२०२५
४. लोकसत्ता - ४/०३/२०२५
५. लोकसत्ता - १०/०३/२०२५